# श्री. किसन पांडुरंग निनावे

सेवक क्र. १३७७ मु. लालगंज, नाईक तलावाजवळ, नागपूर

ह्या मार्गावर यायच्या आधी मी अतिशय दुःखी होतो. माझ्या एका मित्राशी (लंगडा सीताराम) माझे घनिष्ठ संबंध होते. आम्ही दोघे एकाच ताटात जेवण करीत असू. काही दिवसांनी मला कळले की माझा मित्र मंत्र तंत्र जाणतो. एकदा माझ्या त्या मित्राने माझी आई श्रीमती अंजनीबाई हिला आग्या–वेताळ लावला त्यामुळे माझी आई जळाली. मला मात्र याची मुळीच कल्पना नव्हती. ही गोष्ट त्याने स्वतः मला सांगितली. नंतर तो मित्र कसा आहे हे मला कळून आले आणि मी त्याच्याशी संबंध तोडले. नंतर आईच्या प्रकृतीसाठी मी दुसऱ्या जाणत्याकडे गेलो तेव्हा आईला आराम मिळाला. दुसऱ्या जाणत्याने मला मंत्राचे पुस्तक दिले. त्या मंत्राचा मी प्रयोग केला पण मी दुःखी होतो. मी माझे दुःख दूर करण्यासाठी एका भक्ताकडे गेलो. त्या भक्ताने दुर्गादेवीचे सव्वा महिना हवन करावयास सांगितले. त्याचप्रमाणे हवन केले, पण त्यामुळे तात्पुरते समाधान मिळाले. नंतर पुन्हा माझे दुःख वाढले. त्यासाठी मी सेलूवाले केजाजी महाराज यांना गुरु केले. तेथेही दुःख दूर झाले नाही व मनाला समाधान मिळाले नाही.

असे बारा ते चौदा वर्षे मी दुःखातच घालवले. कुठेही समाधान मिळाले नाही. मला पुन्हा मंत्राच्या पुस्तकाची आठवण झाली आणि मनापासून त्या पुस्तकातील दुर्गा देवीच्या मंत्रांचा पाठ केला. दुर्गादेवीच्या मंदिरात जावुन बेचाळीस दिवसांची साधना केली आणि घरी पण दुर्गादेवीचा घट मांडून त्यावर मंत्राचा प्रयोग केला माण्या अंगाण येणे सुरु झाले. बेचाळीस दिवस दसऱ्याच्या दिवशी संपले. त्या दिवशी अंगात देवी आली. ती मला म्हणाली, हा घट दुर्गेचा आहे पण दुर्गा देवळात आहे. ती ह्या स्थानी येऊ शकत नाही कारण तिला दुसऱ्या मित्राने मंत्राव्दारे त्या देवळात बांधून ठेवले आहे. त्याचे नाव आहे लंगडा सीताराम. माझ्या अंगात आलेली देवी, दुर्गादेवीची मुलगी चंडीदेवी आहे. मला दुर्गादेवीने हा मांडलेला घट सांभाळण्यासाठी पाठविले आहे. ती पुढे म्हणाली, तु मांडलेला घट पक्का होऊ शकत नाही. हा सेवक किसन सुध्दा पक्का होऊ शकत नाही असे त्या देवीचे शब्द ऐकताच मी माझे गुरु, केजाजी महाराज यांना हाक मारली. सद्‌गुरु ह्रदयात बसले आणि माझ्या आत्मातन बोलू लागले. त्याचप्रमाणे अनेक देवसुध्दा बोलू लागले. दुर्गादेवीने बाळाला जन्म दिला पण ती त्याला सांभाळू

शकत नाही. अशा अवस्थेत सदगुरु केजाजी महाराज हे त्या घटाच्या ठाणेदारांना म्हणजे नंदाजी महाराजांना आवाज देऊन त्यांच्याशी बोलू लागले की तुम्ही बाळास जन्म देता आणि दुसरीकडे जाऊन बसता. अशा अवस्थेत नंदाजी महाराज घाबरले. आजपर्यंत असे कधीच झाले नाही असे आश्चर्य करीत नंदाजी महाराज बोलु लागले.

तेव्हा सद्‌गुरुने नंदाजी महाराजांना आदेश दिला की तुमच्या ठाण्यात दुर्गादेवी हीच एक वरिष्ठ आहे की अजून तिच्यापेक्षा कोणी दुसरे वरिष्ठ आहे? तेव्हा ठाणेदार नंदाजी महाराज म्हणाले, दुर्गादेवीपेक्षा नरसिंहदेव वरिष्ठ आहे. तेव्हा सद्‌गुरुने नंदाजी महाराजांना आदेश देऊन नरसिंह देवाला बोलावले. त्याच क्षणी नरसिंह देव आले. त्या नरसिंह देवाला सद्‌गुरुंनी आदेश केला की तुम्ही ह्या सेवकाला सत्वावर बसला. तेव्हा नरसिंह देव आणि चंडीदेवी यांनी मिळून त्या सेवकाला सत्वावर बसवून त्याला पक्का करतो असे वचन दिले. त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवशी सत्वाच्या कार्याला सुरुवात केली. त्यादिवशी मला उपवास होता. चंडीदेवीने सत्वाचे चक्र चझविले तेव्हा माझ्या मनात विचार आला की, आपले पुढे काय होर्दल? तेव्हा सद्‌गुरु म्हणाले तु सत्वाचा राजा होशील आणि तू अनेक सेवक बनवशील. तुझे गुरुघराणे होईल. कार्याला दोन–चार दिवस झाले असताना माझ्या मनात एकदम प्रेमाची भावना निर्माण झाली. सर्व लोक मला समान दिसू लागले.

सद्‌गुरुनी मला सांगितले, आता तुझ्यात शक्ती आलेली आहे. तेव्हा माझा हंस उडाल्यासारखे मला वाटते. माझा डावा डोळा फार उडत होता. तेव्हा मी डोळ्याची कल्पना मनात घेताच सद्‌गुरु नाराज झाले. त्यांनी तेव्हा नरसिंह व चंडीदेवी यांना आदेश केला, तुम्ही असतांना ह्या सेवकांच्या डोळ्यावर असा चमत्कार नको. ते तुम्ही ताबडतोब नाहीसे करा आणि सेवकाचे सत्व पूर्ण करुन द्या. त्यावर दोघेही गप्प बसले. कोणीच एक शब्दसुध्दा बोलला नाही. तेव्हा सद्‌गुरुने आदेश दिला तू उंठ आणि त्या चंडीदेवीचा फोटो उलटा करुन ठेव. मी गुरुच्या आदेशाचे पालन केले व तो फोटो उलटा करुन ठेवला तेव्हा नरसिंह देव आणि चंडीदेवी सद्‌गुरुंना म्हणाले फक्त डोळ्याच्या भावनेने तुम्ही फोटो उलटा करण्यास सांगितले. तेव्हा तुम्ही हे कार्य पुर्ण करु शकणार नाही. तुम्हाला जर सत्व पक्के करायचे असेल तर तुम्ही त्या फोटोला सरळ करा. आम्ही त्या सेवकांचे तत्व पक्के करुन देतो. त्यावेळी सद्‌गुरु त्यांना म्हणाले, ह्या ठिकाणी दोघांची आवश्यकता नाही व मी ह्या क्षणी कृष्णाला बोलावले. कृष्ण हा विष्णुचा अवतार आहे व मी सुध्दा कृष्णाचाच अवतार आहे. तितक्यात त्या ठिकाणी विठोबा महाराज व रुक्मिणी आली. त्यांचे सगळ्यांचे बोलणे ऐकुन रुक्मिनी म्हणाली, मी किसनला आपल्या पोटात सामावून घेईन कारण किसन माझा भक्त आहे. त्यावर नरसिंह देव रुक्मिणीला म्हणाले, तुम्ही किसनला आपल्या पोटात सामावून घ्याल तर त्याच्या कुटुंबाचे काय होईल. आणि त्याचा मित्र, मंत्रविद्येने त्याचे कुटुंब नाहीसे करुन

टाकील. त्यावर रुक्मिणी गप्प झाली. ती सद्‌गुरुला म्हणाली, आपण विचाराने कार्य करा. पण नरसिंह देव हट्ट धरुन बसले की मी किसनला सत्वावर पक्का करतो. त्यावर सद्‌गुरुने किसनला फोटो सरळ करण्याचा आदेश दिला व किसनने फोटो सरळ केला. काही क्षणातच दुर्गादेवी त्या ठिकाणी आली व म्हणाली सत्वाच्या समोर कोणत्याही मंत्राचे अथवा जाणत्याचे चालत नाही. मी आता किसनचे सत्व पक्के करते. त्यानंतर सद्‌गुरु आनंदित झाले. दुर्गादेवीने सत्वाचा चक्र चढविला आणि चंडीदेवीला खेळायला सांगितले. पण त्याच दिवशी सायंकाळी चार वाजता मला आठवण आली की दुर्गादेवीने मला उपवास सांगितला नाही तरीपण मी उपवास केला मनात असा विचार आल्यावर आग्यावेताळ जागा झाला आणि दुर्गादेवीला म्हणाला तुमचे सत्व चढलेच नाही. कारण किसनला उपवास करावयास सांगितले नाही. तेव्हा दुर्गा देवीने अनेक वेळा चक्र चढविले. त्यावर आग्यावेताळ चक्र चढेलच नाही म्हणून सांगायचे. तेव्हा आग्याजवळ म्हणाला, मी स्वतः किसनला पक्का करतो. त्यावर दुर्गादेवी म्हणाली की दानवाकडून कधीही सत्व पक्के होऊ शकत नाही. माझा जीव कसातरी होऊ लागला. अशा वेळी आग्यावेताळने मला सांगितले, किसन तु उपवास सोड. हे व्यर्थ आहे. त्याने मला अनेक वेळा प्रेमाने सांगितल्यावर मी उपवास सोडण्यास तयार झालो. एक घास पोटात जाताक्षणी माझा मित्र लंगडा सीताराम(जाणता) माझ्या आत्म्यातुन बोलु लागला. हे किसन, तुझी शक्ती आता माझ्या मुठीत आहे. तुने उपवास छोडा इसलिये तेरा सत्व भंग हो गया है। तेव्हा माझी हिम्मत खचली आणि माझा हंस उडाल्यासारखा मला वाटू लागला. त्यावेळेस मी सर्व देवदेवतांना हाक मारली, पण कोणीही माझ्या मदतीला धावून आले नाही. तेव्हापासून माझा देवदेवतांवरचा आणि गुरुवरचा विश्वास उडाला.

मी वेड्यासारखा करु लागलो. दिवसभर रडत बसे. मला पाच भाऊ होते. त्यापैकी लहान भाऊ परसराम निनावे हा बाबा हनुमानजींच्या मार्गावर साध्या अगरबत्तीवर होता. त्याला वरील घटनेची सर्व हकीगत सांगितली. तेव्हा त्याने बाबा हनुमानजींच्या मार्गावर आल्यानंतर तुझे दुःख नाहीसे होईल व तुला सुख समाधानसुध्दा मिळेल असे सांगितले. त्यावेळी मी परसरामला म्हणालो, जेव्हा मी अनेक देवदेवतांना मानव होतो आणि गुरुसुध्दा केले तरी कोणाच्याही प्रयत्नांना यश मिळाले नाही. आता तु मला एकाच भगवंताच्या मार्गदर्शनाने हे दुःख दूर होईल असे म्हणतो पण ह्याबद्दल मला मुळीच विश्वास वाटत नाही, त्यावर माझ्या भावाने मला विश्वास दिली की तुला ह्या मार्गावर परिपूर्ण समाधान मिळेल.

त्यावर मी भावाला घेऊन श्री गंगाधार पाटील यांच्याकडे गेलो. पाटीलने मला तीर्थ करुन दिल्यावर थोडे समाधान मिळाले. दुसऱ्या दिवशी तीर्थ दिल्यावर जास्त समाधान मिळाले आणि तिसऱ्या दिवशी तीर्थ दिल्यावर आणि रात्री बाबा हनुमानजींच्या नावाने अगरबत्ती लावल्यावर काही देव माझ्या आत्म्यातुन बोलु

लागले. त्यांचे शब्द ऐताच 'बाबा हनुमानजींनी ' माझ्या आत्म्यात प्रवेश केला आणि ते सर्व देवदेवतांना म्हणाले, 'तुम यहां से चले जाव किसन को मरी जरुरत है। यहा मेरी अगरबत्ती चाले है। और यहा मेरा स्थान है।' त्यावेळी प्याल्यात थोडे तीर्थ वाचले होते. हे पाहून सगळ्याचे बोलणे बंद झाले. बाबांचे शब्द ऐकून माझ्या डोळ्यातून सारखे अश्रु वाहू लागले आणि माझा कंठ भरुन आला.

यាप्रमाणे चित्तशांती झाल्यावर मी बाबा हनुमानजींना वचन दिले की बाबांना जीवनात विसरणार नाही. पण तीर्थ प्याल्यात उरलेले आहे. हे लक्षात येताच माझ्या आत्म्यातुन आवाज निघाला, 'बाबा हनुमानजी' तुमचे पण सत्त्व बुडाले कारण लावलेली अगरबत्ती विझली असून तीन वेळा तीर्थ घेऊन सुध्दा ग्लासात उरले आहे. तेव्हा बाबा हनुमानजी तेथे येऊन मला म्हणाले, सेवक उठो और अगरबत्ती जलाओ। साथ में तीर्थ और दो बार लेना । तेव्हा बाबा हनुमानजींनी त्यांना उत्तर दिले. ठहरो। अब बताओ, बाबा हनुमानजी का सत्त्व कैसा खत्म हुआ? अगरबत्ती भी जल रही है और तीर्थ तीन बार क्या मेरा सेवक पाच बार भी ले सकता है। हे एकाच भगवंताचे शब्द ऐकताच सर्वच गप्प झाले व ताबडतोब निघून गेले. भगवंताचे हे चमत्कार प्रत्यक्ष अनुभवले तेव्हा माझे मन एकाच भगवंताकडे वळले.

मार्गावर येण्यासाठी माझे भाऊ परसराम यांना घेऊन मी श्री. राऊत (तबलजी) यांच्याकडे गेलो. श्री. राऊत यांनी आम्हाला बाबांकडे नेले. बाबा मला म्हणाले, किसन, तुम्ही फार चुकले. त्या चुकीची कल्पना माझ्या लक्षात आली. नंतर बाबांनी राऊतकडून मला एकेवीस दिवसांची साधी अगरबत्ती दिली. त्यानंतर मी बेचाळीस दिवसांची त्यागाची अगरबत्ती घेतली. त्याआधी माझ्या पत्नीला एक फोड होता. त्याबद्दल मी बाबांना सांगितले नाही व तो फोड बेचाळीस दिवसांची त्यागाची अगरबत्ती चालू असताना फुटला. फोड फुटल्याची सुचना बाबांना दिली तेव्हा बाबांनी बेचाळीस दिवस बंद करुन डॉक्टरचे उपाय करण्यास सांगितले. फोड दुरुस्त होण्याकरिता दोन ते अडीच महीने लागले. त्यानंतर मी जुन्याच भावनेने पागल झालो, तेव्हा श्री राऊत यांना घेऊन बाबांकडे गेलो. तेथेही मी बाबा जुमदेवजींशी मुर्खासारखा वागलो. मी बाबांना म्हणालो, मी पण स्वतः बाबा आहे. मी स्वतः च्या नावाने प्रणामही केला. अशाप्रकारे मी बाबा जुमदेवजींवर प्रहार केला. तेव्हा मी केलेली चुक माझ्या लक्षात आली आणि मी भगवान बाबा हनुमानजींना, महानत्यागी बाबा जुमदेवजींना आणि बसलेल्या सर्व सेवक बांधवांना वरील बोलण्याची क्षमा मागितली. नंतर मला बाबांनी पागलखान्याच्या दवाखान्यात पाठविले. तिथे बारा शॉक देण्यात आले. तेथील औषधोपचार सुध्दा घेतला. माझ्या पुर्ण कुटुंबालाच औषधोपचार घ्यावा लागला. दोन अडीच महिन्यात मी औषधोपचाराला कंटाळलो. तेव्हा मी भगवान बाबा हनुमानजीला बेचाळीस दिवस चालु करण्याबद्दल विनंती केली व योग मागितला. मला भगवंताने योग दिला तेव्हा माझ्या कुटुंबाचा औषधोपचार

एकदम बंद झाला. तरीही मी भगवंताच्या कृपेला ओळखू शकलो नाहीगेलो तरअ
बेचाळीस दिवस घेण्याकरिता बाबांकडे नाही. . माझ्या विचारात फरक पडला की स
महिने निघून गेले. जर मी बाबांकडे गेलो तर बाबा माझ्यावर रागावतील. ह्या भीत
मी बाबांकडे गेलो नाही. शेवटी भगवंताने मला पुन्हा योग दिला व माझे म
भगवंताकडे वळले. तेव्हा मी माझ्या कुटुंबाला घेऊन बाबांकडे जाऊन बाबां
बेचाळीस दिवसांची उपासना मागितली. त्यावेळी बाबा म्हणाले, मी कोणत्या
सेवकाला स्वत: मार्ग देत नाही. कारण मला दौऱ्यावर जावे लागते. तेव्हा बाबांनी श्री
रामाजी बारापात्रे यांच्याकडून मला एकवीस दिवस साधी अगरबत्ती दिली. त्य
अवधीत मी स्वप्नात खाली पडलो. तेव्हा मी ओरडलो, देवी हो या देवता, लहान हो य
मोठा मला वर उचला. त्यावेळेस मला एका झोपडीत एक लहानसा बाळ झोपलेल
दिसला. त्या बाळाजवळ मी जाऊन बसलो व म्हणालो, ह्या जगात मला वर
उचलण्याकरिता कोणीच धावत नाही. ह्या जगात परमेश्वर नाही का? तेव्हा त्या
ठिकाणी एक बाई आली. ती मला म्हणाली, तुम्ही कशासाठी ह्या ठिकाणी आले. त्या
बाईने मला ओळखले म्हणून मी सांगितले. त्यावर मी म्हणालो, ह्या जगात परमेश्वर
नाही काय? त्या बाळाला मी उचलुन धरले. नंतर ती बाई मला म्हणाली, तुमचे लक्ष
कुठे आहे? तुमच्याशी स्वयम भगवान बाबा हनुमानजी बोलत आहे. तेव्हा मी त्या
बाळाकडे लक्ष देऊन पाहिले तेव्हा त्या बाळात मला भगवान बाबा हनुमानजी दिसू
लागले. तेव्हा बाबांनी माझी परिक्षा घेतली व म्हणाले सेवक कितने दिन हुए इस तत्त्व
पर आने को? मी म्हणालो, बहोत दिन हुए बाबा। बाबा म्हणाले इतने दिन कहॉं गया
था? मी म्हणालो, कहीं नही । तेव्हा बाबा म्हणाले, ठहरो, तुम्हारी बिमारी दूर करने
की दवा मैं देता हूँ। तेव्हा बाबा खेळत खेळत एका भिंतीच्या आत गेले आणि लगेच
परत आले. मग बाबांनी मला तीन गोळ्या दिल्या व म्हणाले ये तेरी बिमारी की दवा है।
तेव्हा मी बाबांकडे एकसारखा पाहत होतो. बाबा निघून गेले. हा चमत्कार मला
एकवीस दिवसाच्या साधनेतच झाला.

एक दिवस दुपारच्या वेळी काम करीत असताना मला आळस आला. मी
झोपाळ्यावर लोटलो. तेथेच मला झोप लागली. मला झोपेत एक नदी दिसली.
नदीकाठी बरेचसे स्त्री आणि पुरुष बसलेले होते. त्यात एक परदेशी बाई होती. ती
उठून मला म्हणाली. तू माझा आहे आणि तू माझ्यासाठी रडत आहे. तेव्हा मी त्या
बाईला म्हणालो, मी तुझ्यासाठी नाही. बाबांसाठी रडत आहे. तेव्हा ती बाई व सर्वच
मंडळी तेथून निघून गेली. तेव्हा मी बाबा, बाबा करीत निघालो. पण माझ्या तोंडून
दुसरेच शब्द निघाले. पण मला ते कळले नाही. त्याचक्षणी बाबांनी मला पिरडून
टाकले. मला बाबांचे शब्द ऐकू आले की तू असे का बोललास? तेव्हा मी त्या
बोलण्याची बाबांना क्षमा मागितल्यावर बाबांनी मला पिरडणे बंद केले. हा चमत्कार
एकवीस दिवसांच्या साधनेमध्येच घडला.

तिसरा अनुभव एकवीस दिवसांच्या समाप्तीच्या दिवशी आला. रात्री मला स्वप्न पडले. या स्वप्नात बाबा आले. नदीच्या किनाऱ्यावर बरेचसे सेवक बसलेले होते. बाबा चौरंगावर बसलेले होते. तेव्हा माझ्या भावांनी मला बाबांकडे नेले. बाबांनी मला तीन शब्द दिले. ते मला आठवण नाहीत. बाबांनी स्वतः बसून मला ते शब्द पाठ करण्यास सांगितले. नंतर बाबांनी घेतलेल्या परीक्षेत पास झालो नाही. त्यावर बाबा म्हणाले, तु इतके लवकर हे शब्द विसरतोस तर पुढे कसा करशील?

वरील तीनही अनुभव बाबांकडे जाऊन सांगितल्यावर बाबांनी मला श्री. रामाजी बारापात्रे यांच्याकडून बेचाळीस दिवस त्यागाचे दिले. बेचाळीस दिवसात मला व माझ्या कुटुंबाला भगवंताने आणि बाबा जुमदेवजींच्या कृपेने परिपूर्ण समाधान मिळाले आणि मी वरील दुःखातून मुक्त झालो.

काही दिवसानंतर मी माझ्या कुटुंबाला घेऊन बाबांकडे दर्शनाला गेलो. बाबांनी जाण्याची परवानगी दिल्यावर आम्ही बाबांना नमस्कार केला. सोबत माझी मुलगी होती. तिला नमस्कार करायला सांगितला पण ती लाजली व बाबांनी नमस्कार घेतला नाही. एक-दोन दिवसानंतर त्याच मुलीला खूप ताप आला. त्यासाठी भगवंताला विनंती केली पण ताप कमी झाला नाही. नंतर मी परमेश्वराला शब्द दिला. भगवान, माझ्या कुटुंबात असे दुःख दाखवू नका. मारायचे असेल तर आताच मारा. नाही तर ह्या मुलींचे दुःख दूर करा. मला झोप लागली. नंतर मला स्वप्न पडले. माझ्या छातीवर एक मोझा पहाड येऊन पडला. असून त्याखाली मी दबलो आहे. तेव्हा मी भगवान बाबा हनुमानजींना विनंती केली, बाबा मला उचला. असे बोलताच बाबा जुमदेवजी आकाश मार्गाचे उतरले. मला बाबांनी आशिर्वाद दिला तेव्हा तो पहाड आपोआप उडाला तेव्हा बाबा जुमदेवजी उद्‌गारले, जिथे एक भगवान आहे तिथे त्याला उचलणार कोण?

मी बाबा जुमदेवजींना मुलीच्या तापाबद्दल सांगितले व म्हणालो, मी कुठे चुकलो हे माझ्या लक्षात येत नाही. तेव्हा बाबा जुमदेवजींनी मला आठवण करुन दिली. ह्या मुलीने तुम्ही सांगितल्यावर बाबांना नमस्कार केला नाही आणि ती लाजली म्हणून दुःख निर्माण झाले आहे. मला एकदम जाग आली. दुसऱ्या दिवशी त्या चुकीबद्दल क्षमा मागण्याचा विसर पडला. नंतर मी श्री. रामाजी बारापात्रे यांच्या घरी गेलो. तेथे मला एकदम क्षमा मागितली नाही याची आठवण झाली. नंतर मी घरी आलो आणि भगवान बाबा हनुमानजी तसेच महानत्यागी बाबा जुमदेवजी यांना क्षमा मागितली. त्यानंतर मुलीचा ताप एकदम कमी झाला. ह्या मार्गावर आल्यानंतर मला एका भगवंताची ओळख पटली. सत्य, मर्यादा आणि प्रेम ह्या तीन शब्दांचा उपदेश महानत्यागी बाबा जुमदेवजींनी सर्व सेवकांना विनामूल्य दिला आहे. ही तत्त्वे सांभाळणे माझे व सर्व सेवकांचे कर्तव्य आहे. अशा भगवंताला मी जीवनात कधी विसरणार नाही असे सत्य वचन देतो.

* * * * *